# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**4 JULY, 2018**

[Time : 09-00]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(30 Words Per Minute)

**SECTION - II**

(Time Allowed : 7 Minutes)

**मराठी टंकलेखन**

(३० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - २**

(वेळ : ७ मिनिटे)

**सूचना :** गती उतारा एकदा टंकलिखित झाल्यावर पुन्हा तोच उतारा टंकलिखित करू नये. खालील मजकूर डाव्या बाजूस १५ पदे समास सोडून द्विपंक्ती (डबल लाइन स्पेसिंग) अंतराने टंकलिखित करा.

---

**[गुण : ४०]**

पालक लहानपणापासून मुलांच्या शालेय शिक्षणातल्या प्रगतीकडे डोळ्यात तेल घालून लक्ष पुरवतात. चांगली नावाजलेली शाळा, तेवढ्यावर कसं भागणार म्हणून शाळेव्यतिरिक्त एखादा अभ्यासाचा क्लास, खेळात राज्यस्तरावर कामगीरी असेल, तर करिअरसाठी फायद्याचा म्हणून एखादा खेळ, गायन-वादन असं काही कौशल्य असेल तर त्याकडं करिअरचा पर्याय म्हणून पाहता यावं, यासाठी एखादा क्लास असं मुलाला “सर्वगुण संपन्न” करण्यासाठी वाटेल तेवढा पैसा ओतायचा अट्टाहास पालक करतात. प्रत्येक क्षेत्रात प्रत्येकाशी स्पर्धा करण्याची मानसिकता आधी स्वतःची आणि मग मुलांची पालकच तयार करतात. पण एवढा सगळा खटाटोप करूनही आनंदी, समाधानी होणं शिकायचं मात्र राहून जातं. इतरांशी गोड बोलून, हसतमुख कसं राहायचं ? मित्र-मैत्रिणींशी जिवाभावाचं नातं कसं जोपासायचं ? आजी, आजोबा, काका, मामा, आत्या या सगळ्या नातेवाइकांना धरून कसं राहायचं ? या गोष्टी शिकणं खूप महत्त्वाचं आहे. हे पालकही विसरतात आणि मुलांना तर त्याविषयीची माहितीच नसेत. यामुळं होतं काय तर मुलांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा विकासच खुंटतो.

भावनिक बुद्धिमत्ता म्हणजे जीवनकौशल्यं वापरून आनंदी होणं.

---